१) मा.आयुक्त यांचेकडील मंजुर प्रस्ताव दि.२०/१२/२०१०
२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १२७२२ दि. २३/११/२०१०
३) मा.महापालिका सभा ठराव क्र. १०४० दि. २०/०१/२०११

---

**सुधारीत आदेश**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८
पर्यावरण अभियांत्रिकी कक्ष
जा.क्र.पअक/कावि/३२५ /२०११
दिनांक २९ /०९/२०११

29 SEP 2011

**विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका गृहप्रकल्पांमध्ये ग्रीन बिल्डींग रेटिंग सिस्टिम राबविणेच्या धोरणाची अंमलबजावणी करणे.**

संदर्भ – यापूर्वीचा आदेश क्रमांक जा.क्र/पअक/कावि/२०९/२०११ दि.२५/०७/२०११

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाक्षेत्रात पर्यावरण संवर्धन व संरक्षणास चालना देणेचे दृष्टीने ग्रीन बिल्डींग रेटिंग सिस्टिम राबविणे विचाराधीन होते. भारत सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्रालय (MNRE) व TERI यांचे ADaRSH **संस्थेमार्फत GRIHA** ही **" ग्रीन रेटिंग सिस्टीम "** विकसित करणेत आली आहे. पर्यावरणपूरक इमारतींना प्रोत्साहन मिळणेच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने GRIHA ची ग्रीन बिल्डींग रेटिंग सिस्टिम राबविण्याचे प्रस्तावास उपरोक्त वाचले क्र. १ नुसार मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असुन महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती व मा.महापालिका सभेने वाचले क्र. २ व ३ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरच्या धोरणाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करणेत येईल.

१) प्रथमतः विकसन कर्त्यानी ग्रीन बिल्डींग प्रकल्प करण्याचे निश्चित केल्यानंतर म.न.पा.च्या "www.pcmcindia.gov.in" या वेब पोर्टलवर सुविधा दिलेनुसार GRIHA या संस्थेकडे नोंदणी (Registration) करावे लागेल. यासाठी आवश्यक ती नोंदणी फी GRIHA कडे भरावी लागेल.

२) नोंदणी झालेनंतर GRIHA संस्थे मार्फत विकसनकर्त्याला आवश्यक ते सर्व मार्गदर्शन / ट्रेनिंग देणेत येईल.

३) त्यानंतर ग्रीन बिल्डींग बाबतचा सविस्तर प्रस्ताव योग्य त्या कागद पत्रासह बांधकाम परवानगीसाठी दोन प्रतीत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे सादर करावा लागेल.. यामधील एक प्रत बांधकाम परवानगी विभागाकडे देण्यात येईल व दुसरी प्रत पर्यावरण अभियांत्रिकी कक्षा मार्फत GRIHA या संस्थेकडे पुढील छाननी व तपासणीसाठी जाईल.

४) GRIHA या संस्थेमार्फत संपुर्ण प्रकल्पाची निर्धारीत केलेल्या मानांकाप्रमाणे छाननी करुन योग्य ते गुणांकन दिले जाईल.

५) प्राप्त गुणांकन नुसार योग्य ते स्टार रेटिंग देणेत येईल व मा. महापालिका सभेने मान्यता दिलेनुसार बांधकाम परवानगी देताना आकारण्यात येणा-या प्रिमियम मध्ये खालीलप्रमाणे सवलत देय राहील.

| प्राप्त गुणांकन | स्टार रेटींग | प्रिमियम सवलत |
|---|---|---|
| 50-60 | * | 10% |
| 61-70 | ** | 20% |
| 71-80 | *** | 30% |
| 81-90 | ***** | 40% |
| 91-100 | ****** | 50% |

- यामधील दोन स्टार पर्यंतची सवलत पहिल्या फक्त २५ प्रकल्पांना दिली जाईल.

सदरचे सवलतीच्या प्रिमियममध्ये खालील प्रिमियमचा समावेश असेल.

१) बंदिस्त बाल्कनी प्रिमियम
२) टेनामेन्ट प्रिमियम
३) जिना, पॅसेज, लिफ्ट, मशीनरुम प्रिमियम
४) कव्हरेज प्रिमियम

बांधकाम परवानगी देताना विकास शुल्क व फायर प्रिमियम हा शासनाचे आदेशानुसार निधी स्वरुपात आकारला जात असल्यामुळे त्यावर प्रिमियम सवलत प्रस्तावित नाही. बांधकाम परवानगी देताना प्रथमतः सर्व प्रकारची प्रिमियम रक्कम भरणे अनिवार्य असुन प्राप्त गुणांकनानुसार मिळणारी सवलत GRIHA च्या पोस्ट सर्टिफिकेट नंतरच देणेत येईल. सदरची सवलत BRTS रस्त्यावरील फ्लॅटधारकांसाठी सुध्दा लागु राहील.

बांधकाम परवानगी विभागामार्फत देणेत येणाऱ्या अंतीम भोगवटा [Completion Certificate] पत्राचे वेळेस अंतीम ग्रीन बिल्डींग Certificate देणेत येईल. सदरचे ग्रीन बिल्डींग Certificate पाच वर्षासाठी ग्राह्य राहील त्यानंतर बिल्डींगचे ऑडिट करुन त्याचे नुतनीकरण करुन घ्यावे लागेल.

बिल्डरने प्रकल्प पुर्ण करुन फ्लॅटधारकांना हस्तातरीत केल्यानंतर ग्रीन बिल्डींग प्रकल्पातील फ्लॅटधारकांना **सामान्य कराची** जी रक्कम येईल त्यामध्ये **3 Star** व त्यापेक्षा जास्त **Rating** प्राप्त असणाऱ्या फ्लॅटधारकांना खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

| प्राप्त स्टार रेटींग | सामान्य करातील सवलत |
|---|---|
| *** | 5% |
| **** | 8% |
| ***** | 10% |

विकसनकर्त्याला प्रिमियममधील सवलत दि.२० जानेवारी २०११ नंतर दाखल झालेल्या प्रस्तावा करिता लागू राहील. सबब पिंपरी चिंचवड शहरासाठी **GRIHA** ने प्रस्तावित केलेनुसार व मा.महापालिका सभेने मान्यता दिलेनुसार उपरोक्त प्रमाणे **"ग्रीन बिल्डींग रेटिंग "** सिस्टिमच्या धोरणाची अंमलवजावणी चालु करणेस या सुधारित आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे. तसेच यावाबतचा यापुर्वीचा दि. २५/०७/२०११ चा संदर्भिय आदेश रद्द समजणेत यावा.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

१. शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

२. उपसंचालक, नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

३. उपशहर अभियंता
बांधकाम पर्यावरण विभाग

४. कार्यकारी अभियंता (सर्व विभाग)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

५. सहा.आयुक्त, करसंकलन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

६. मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८